# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/03/2023 (शनिवार) दुपार

---

## जबरी संभोग

पो.स्टे. खापरखेडा :– दिनांक १/१२/२०२२ चे ११.३० वा. ते ३१/१/२०२३ चे ००.०० वा. चे दरम्यान फिर्यादी/पिडीता वय १७ वर्ष हिला जास्त रक्तस्त्राव झाल्याने उपचार कामी मेडीकल कॉलेज येथे भर्ती केले असता तिने सांगितले की तिचे मागील १ वर्षापासुन **आरोपी नामे– अमोल चंदनकर रा. नेउरवाडा ता. पारशिवनी जि. नागपुर** याचे सोबत प्रेमसंबंध होते व त्यातुनच तिला गर्भधारणा राहिली मागील ८ दिवसापुर्वी तिला अधिक रक्तस्त्राव होत असल्याने पारशिवनी येथे खाजगी दवाखान्यात उपचार केला तरी रक्तस्त्राव थांबत नसल्यामंळे उपचारकामी सावनेर येथील डॉ भगत यांचेकडे गेली असता त्यांनी तिला मेडीकल कॉलेज नागपुर येथे जाण्यास सांगीतले वरुन तिला मेडीकल कॉलेज नागपुर येथे भर्ती केले असता पिडीत अल्पवयीन मुलगी ही गर्भवती असल्याचे समजल्याने त्यांनी पो स्टे पारशिवनी येथे एमएलसी रिपोर्ट पाठविला असता पिडीत हिचा जबाब मपोउपनी सिमा बेन्द्रे यांनी नोंदविला सदर जबाब व एमएलसी रिपोर्ट हे घटनास्थळ खापरखेडा हददीतील असल्याने पोस्टे पारशिवनी कडुन वर्ग करुन प्राप्त झाले आहे सदर पिडीत अल्पवयीन मुलीचे वय हे संमती देण्यायोग्य नसतांना यातील आरोपी याने तिच्याशी प्रेमसंबंध स्थापित करुन तुझयासोबत लग्न करतो असे सांगुन तिच्याशी शारीरीक संबंध प्रस्थापित केले त्यातुन सदर पिडीत ही गर्भवती राहीली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम ३७६, ३७६(२) (j), 376 (2)(n), भा.द.वि. सहकलम ४, ८ बाल लैगिंक अधिनियम २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी मलकुवर पोस्टे खापरखेडा मो नं ९६२३६८७६२७ हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील पारशिवनी जुना बसस्टॉप येथे दिनांक ०८/०३/२०२३ चे १३/३० ते १७/०३/२०२३ पर्यंत दरम्यान १) रंजित ठाकूर २) रूपा ठाकूर ३) गौरव तोमर ४) रूपेश खुरावत ५) मोहन ठाकुर + ०३ अनाळखी इसम यांनी संगणमत करून गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादि नामे– सौ. स्वाती दिनेश राउत, वय ३९ वर्ष रा. पारशिवनी यांच्या कापडाच्या दुकानात जावुन फिर्यादिला व तिच्या पतीला शिवीगाळ करून धक्काबुक्की केली व पाहुन घेण्याची धमकी दिली व दुकानात काम करणारी दुर्गा हिचा पोटावर बुक्की मारली दि.१५/०३/२०२३ रोजी मोहन ठाकुर व ०१ अनोळखी इसम फिर्यादिचे दुकाना समोर वारंवार चक्कर मारून समोर येउन थांबत होता व दुकानाकडे बघत होता दुकानात काम करण्याऱ्या मुलाने काय पाहीजे असे विचारल्यावर न बोलता निघुन गेले फियादीचे मनात आरोपीतां कडुन भिती निर्माण झाल्याने फिर्यादीने पती सोबत पोस्टेला येउन रीपोर्ट दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, १४८, १४९, ४५२, ३२३, ५०४, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/गजानन उके बोंद्रे ब.नं.१०८९ मो.न. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर